गुरूवार दि.८ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# बच्चू कडू यांच्या मोर्चाला संभाजी नगर पोलिसांनी परवानगी नाकारली

## तरी मोर्चा काढण्यावर प्रहार ठाम; कोण अडवते ते पाहू! सरकारला इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मोर्चाचे आयोजन केले आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आपण हा मोर्चा काढत असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले होते. या मोर्चाच्या माध्यमातून बच्चू कडू हे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती सोबत असतील की महाआघाडी सोबत, याचा निर्णय देखील जाहीर करणार आहेत. मात्र, आता या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी परवानगी नाकारली असली तरी आम्ही मोर्चा काढणारच, असा निर्धार बच्चू कडू यांनी व्यक्त केला आहे. आम्हाला कोण आडवते, ते आम्ही बघू, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.



आमदार बच्चू कडू हे महायुती सोबत असले तरी देखील ते मागील काही महिन्यांपासून त्यांनी महायुती विरोधात भूमिका घेतली आहे. लोकसभा निवडणुकीत देखील महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात बच्चू कडू यांनी स्वतंत्र उमेदवार दिला होता. त्यामुळे बच्चू कडू महायुती सोबत राहणार नाहीत, अशी शक्यता वर्तवली जात होती. आता आगामी विधानसभा निवडणुकीत देखील बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीचे संकेत दिले होते. राजू शेट्टी, इम्तियाज जलील, रविकांत तुपकर यांच्यासह अनेक छोट्या पक्षाच्या नेत्यांनी आता तिसऱ्या आघाडीचे संकेत दिले आहेत. या संदर्भात बच्चू कडू यांची नेमकी भूमिका काय? हे या मोर्चात जाहीर करणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले होते. त्यामुळे या मोर्चाकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.शेतकऱ्यांच्या विविध मागण्या या मोर्चाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहेत. त्यासाठी संभाजीनगर येथे लाखोंच्या संख्येने शेतकरी एकत्र येणार आहेत. एकीकडे राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी वाद सुरू असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देखील या माध्यमातून सरकारला घेरण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ९ ऑगस्टला संभाजीनगर मध्ये भव्य मोर्चा काढून आमची ताकद दाखवून देऊ, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला होता. मात्र, या मोर्चाला आता परवानगी नाकारण्यात आल्याने बच्चू कडू चांगलेच आक्रमक झाले आहेत. आम्ही कोणत्याही परिस्थितीत मोर्चा काढणार आहे, असा निर्धार त्यांनी व्यक्त केलाय.

### शासकीय खरेदीसाठी

# शेतकऱ्यांनी कापसाची ई पीक पाहणी करावी-सभापती ए.जे.बोराडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

येणाऱ्या कापूस हंगामात सरकार सीसीआय मार्फत कापूस खरेदी करणार असून या खरेदी करिता शासनाच्या नियमावली नुसार शेतकऱ्याची पद्वारे ई पीक पाहणी नोंद सात बारा वर असणे आवश्यक असल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करत असताना कापूस लागवड क्षेत्राची ऑनलाईन ई पीक पाहणी करावी असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की,



सन २०२४-२५ या हंगामात सीसीआयला कापूस विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांनी सातबारावर कापसाची नोंद करणे आवश्यक आहे तसेच शेतकऱ्याचा मोबाईल क्रमांक आधार कार्डाशी लिंक असणे आवश्यक आहे.एअरटेल पेमेंट बँक, पेटीएम बँक, पोस्टल बैंक, जनधन खाते ई. बँकेमध्ये ऑनलाईन पैसे जमा करण्याचा शासनाचा नियम असल्याने सदर शेतकऱ्याने काळजीपूर्वक आधारकार्ड बँकेकडून लिंक असल्याची खातरजमा करून घ्यावी,चालू हंगामात पाऊस पाणी भरपूर प्रमाणत झाला असल्याने कापसाचे पीक भरपूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही अश्या परिस्थितीत तालुक्यातील एकही शेतकरी अडचणीत येणार नाही याची यासाठी बाजार समिती कडून योग्य त्या उपाय योजना केल्या जातील असे शेवटी नमूद केले आहे.

# मनसे विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

बुलढाणा जिल्ह्यात मा.राजसाहेब ठाकरे यांच्या दौऱ्यापूर्वी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मेहकर व सिंदखेड़ राजा विधानसभा मतदार संघाची आढावा बैठक मुंबई येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते नगरसेवक साईनाथ बाबर मनविसे प्रदेश सरचिटणीस संदिप पांचगे यांच्या उपस्थिती दिनांक २ ऑगस्ट २०२४ रोजी आढावा बैठक संपन्न झाली , या बैठकीत मेहकर व सिंदखेड़राजा विधानसभा निवडणूक लढविन्यास ईच्छुक उमेदवार व दोन्ही मतदार संघातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांशी सखोल चर्चा करण्यात आली. त्यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भाऊ जाधव मनविसे जिल्हा अध्यक्ष शिवादादा पुरंदरे येणाऱ्या काळात प्रत्येक मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा झेंडा कसा फडकविण्यात येईल याबाबत चर्चा करू महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न जास्तीत जास्त कसे सोडवण्यात येईल यावर भर



देण्याबाबत सूचना देण्यात आली.

माननीय राज साहेब ठाकरे यांचा दौरा म्हणजे जिल्हातिल सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे त्यावेळी मेहकर तालुका अध्यक्ष संतोष अंभोरे लोणार तालुका अध्यक्ष गणेश सातपुते सिंदखेडराजा शहर अध्यक्ष घनश्याम केळकर मनविसे जिल्हा उपाध्यक्ष अतिश राजे जाधव देऊळगाव राजा शहरं अध्यक्ष बंडू डोळस मनसे आकाश चाटे शेतकरी सेनेचे मानघाले मेहकर शहर अध्यक्ष श्रतुहन चेके सुत्र संचालन पत्रकार फिरोज शहा यांनी केले आहे.

# दानापूर येथे सहा ऑगस्ट रोजी तन नाशक फवारणी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथे मोठ्या प्रमाणात गाव गल्लीत, सार्वजनिक जागा, शैक्षणिक जागा, आरोग्य जागा, सामाजिक जागेवर या ठिकाणी सततच्या रिमझिम रिमझिम पावसामुळे तन मोठ्या प्रमाणात वाढलेले होते त्या अडीअडचणीमध्ये कीड किटकुल व मच्छरांचा प्रादुर्भाव वाढत असल्याकारणाने ग्रामपंचायत ने तन नाशक फवारणी करण्यात आली नुकतेच १२ जुलै रोजी नवनिर्वाचित सरपंच पदी निवड झालेल्या पुष्पा जनार्दन दळवी, ग्रामसेवक संजय पाचगे यांनी गावात तन नाशक दिनांक सहा ऑगस्ट रोजी पूर्ण गावामध्ये तन नाशक फवारणी करण्यातआले यावेळी ग्रामपंचायतचे कर्मचारी नारायण मोकाशे, रमेश कनगरे अधि कर्मचारी तन नाशक फवारणी करताना दिसत आहेत.

# बलवडी ते मेथवडे पर्यंतचे बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात येणार-आमदार शहाजीबापू पाटील

## टेंभूचे पाणी आज सकाळी माण नदीत दाखल होणार,शेतकऱ्यांना दिलासा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

खरीप हंगामातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभूयोजनेचे आवर्तन सुरू करून सांगोला तालुक्यातील माण नदीवरील सर्व बंधारे भरून देण्याच्या मागणीची दखल घेतली आहे.टेंभूयोजनेच्या पाण्याचे आवर्तन आटपाडी तालुक्यातील घाणंद तलावात सुरू असून सध्या तलाव भरला असून आज सकाळी टेंभूचे पाणी ३५० क्युसेसने माण नदीत दाखल होणार आहे. टेंभूच्या पाण्याने माण नदीवरील बलवडी ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे तसेच बुद्धेहाळ, जुनोनी, हातीद, पाचेगाव, जुजारपूर, हटकर मंगेवाडी, राजुरी या गावातील तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरण्यात येणार असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

यावर्षीटेंभूयोजनेचे उन्हाळी आवर्तन पहिल्यांदाच सांगोला तालुक्याला मिळाले. त्यावेळी माण नदीवरील सर्व बंधारे भरून यशस्वीरीत्या आवर्तन पूर्ण झाले होते. ऐन उन्हाळ्यात माण नदीला पाणी आल्याने शेतकरी सुखावला होता. खरीप हंगामातील पिकांना जीवदान देण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा पाण्याचा आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठीटेंभूयोजनेचे पाणी माण नदीत सोडून बलवडी ते मेथवडेपर्यंतचे सर्व बंधारे भरून देण्याची मागणी शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस,टेंभूउपसा सिंचन योजनेचे



कार्यकारी अभियंता राजन रेड्डीयार यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन टेंभू सिंचन प्रकल्पाचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे. सध्या टेंभूचे आवर्तन आटपाडी तालुक्यातील घाणंद तलावात सुरू असून तलाव शंभर टक्के भरल आहे. आज सकाळी टेंभूचे पाणी घाणंद तलावातून माण नदीत दाखल होणार आहे. टेंभूच्या पाण्याने माण नदीवरील बलवडी ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात येणार आहेत.तसेच बुद्धेहाळ, जुनोनी, हातीद, पाचेगाव, जुजारपूर, हटकर मंगेवाडी, राजुरी या गावातील तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने शंभर टक्के भरण्यात येणार आहेत. टेंभूप्रकल्पाच्या पाण्याचे आवर्तन सुरू झाल्याने जनावरांच्या पाण्याचा व चाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागला आहे. टेंभूचे पाणी माण नदीत दाखल झाल्याने बलवडी, वझरे, नाझरे, चिणके, अनकढाळ, वाटंबरे, कमलापूर, वासुद, अकोला, कडलास, वाढेगाव, बामणी, सावे, मांजरी, देवळे, मेथवडे या गावांसह अन्य १५ ते २० गावांना फायदा होणार असून या पाण्यामुळे सिंचनाचा प्रश्न मार्गी लागला आहे असल्याची माहिती शिवसेनेचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.


# एकुर्का येथील अंजुम पठाण सेट परीक्षेत उत्तीर्ण

## सर्व स्तरातून कौतुक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर तालुक्यातील एकुर्का रोड येथील रहिवाशी



अंजुम रसूल पठाण हि सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे तर्फे ७ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परिक्षा (सेट) उत्तीर्ण झाली आहे.

अंजुम पठाण हिचे प्राथमिक शिक्षण एकुर्का रोड येथील जि. प. प्रा. शाळा व समर्थ विद्यालयात झाले असून माध्यमिकचे शिक्षण विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर येथे झाले आहे. उच्च माध्यमिक व बी. एस्सी. चे शिक्षण शिवाजी महाविद्यालय, उदगीर येथे झाले. तर नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून रसायनशास्त्र या विषयात एम. एस्सी. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहे. सेट परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

झाडे लावा झाडे जगवा



### चारोळी

कल्पनेच्या विश्वात रमण्यापेक्षा
वास्तव स्वीकारून पुढे जावे
पोकळ आनंद काही क्षणाचा
अंतरंगी डोकवत वाट चालावे.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# नायगांवचा अभिजित मुजमुले याची सामान्य कुटुंबातून यशाला गवसणी

## भूमी अभिलेख विभागात अभिलेखापाल पदी निवड



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

तालुक्यातील मौजे नायगांव येथील अभिजित महादेव मुजमुले याची भूमी अभिलेख विभागात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल या पदासाठी निवड झाली आहे.त्याच्या या निवडीबद्दल सर्वच स्तरामधून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

अभिजित मुळातच होतकरु असल्याने स्पर्धा परीक्षेत सातत्य राखत शासकीय सेवेचे त्याचे स्वप्न साकार झाले.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन सर्वसामान्य कुटुंबातून मेहनतीने हे यश मिळवले.त्याचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर पॉलीटेकनिकचे शिक्षण योगेश्वरी कॉलेज अंबाजोगाई आणि सिव्हिल इंजिनियरिंग-बी टेक हे अहमदपूर येथे पुर्ण झाले.मात्र शिक्षण पुर्ण झाले परंतु मनातील शासकीय सेवेचे स्वप्न शांत बसू देत नव्हते.त्यामुळे २०२३ पासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केला,त्याने अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द न सोडता सातत्यपूर्ण अभ्यास करत भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत अभिलेखापाल पदी त्याची निवड झाली.अभिजीतने हे यश आपल्या अभ्यासातील सातत्य,चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले आहे.त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट,नातेवाईक,मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.ते पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांचे लहान बंधू आहेत.

# अवजड वाहनांची वाहतूक जिरेवाडी बायपास मार्गे करावी; अन्यथा तीव्र आंदोलन-अॅड.मनोज संकाये

## संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना मित्र मंडळाच्यावतीने निवेदन सादर!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

अवजड वाहनांची वाहतूक सुलभ पणे करता यावी म्हणून जिरेवाडी मार्गे बायपासची निर्मिती करण्यात आली. परळी शहरांमध्ये वाहतुकीची समस्या मोठ्या प्रमाणावर आहे. वाहतूक कोंडी ही एक जटील समस्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे पोलीस प्रशासनाने अवजड वाहनांची वाहतूक जिरेवाडी बायपास मार्गे करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अॅड.मनोज संकाये यांनी केली असून मागणीचे निवेदन परळी येथील संभाजीनगर पोलीस स्टेशनचे निरीक्षक यांना मित्र मंडळाच्या वतीने सादर केले. मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, परळी शहरांमध्ये वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. अवजड वाहनांची वाहतूक शहरात मोठ्या प्रमाणावर होते. याचा ताण पोलीस प्रशासनावर येतो. मालवाहतुकीची वाहने, राखी चे टँकर इतर लहान-मोठे वाहने याची वाहतूक होते. या वाहतुकीमुळे शहरांमध्ये प्रदूषणाची समस्या निर्माण झाली असून सामान्य माणसाचे जीवन जगणे कठीण झाले आहे. राखेचे टँकर राखेची वाहतूक करत असताना ती ताडपत्रीने झाकली जात



नसल्यामुळे राख उडून नागरिकांना डोळ्याचे आणि श्वसनाचे विकार जडत आहेत. पोलीस प्रशासनाचा ताण कमी व्हावा म्हणून प्रशासनाने ह्या अवजड वाहनांची जिरेवाडी बायपास मार्गे वाहतूक करावी अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष पिसे, अनिल चौधरी, राम जोशी,राहुल कांदे, गिरीश सलगरे, शिवा बडे, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे, अनिल मिसाळ, कैलास रिकिबे, पत्रकार मोहन चव्हाण, संतोष कांदे, संतोष कांबळे, सुंदर आव्हाड, सुरेंद्र परदेशी, राजीव कसबे, वैजनाथ केंद्रे, आकाश जोगदंड, सदाशिव गोडे, परमेश्वर कसबे, विनोद रोडे, प्रमोद पुरी, वसंत मुंडे, अर्जुन गिरी , अनंत कातकडे, गोविंद कांदे, योगेश मुंडे, गजानन पांचाळ, बालाजी मुंडे ,जयसिंग रोडे आदी उपस्थित होते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी व भव्य मातंग समाज एकता मेळावा संपन्न



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव शहरांमध्ये आज दिनांक ७ ऑगस्ट रोजी लोकशाहीर समाज सुधारक लेखक कादंबरीकार अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये पार पडली व व्हि ,के मंगल कार्यालय येथे भव्य मातंग समाज एकता मेळावाचे आयोजन करण्यात आले होते या मेळाव्यासाठी मातंग समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता यावेळी भारतीय जनता पार्टीचे युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर मनोगत व्यक्त केले, त्यानंतर ढोल ताशाच्या गजरामध्ये भव्य मिरवणूक काढण्यात आली होती,

# विविध विकास कामांच्या माध्यमातून मतदार संघाचा कायापालट केला-सौ.आशाताई शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील मंगलसांगवी येथे लोहा-कंधार मतदार संघाची कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या निधीतून महादेव मंदिर सभागृहाचे लोकार्पण दि.७ ऑगस्ट रोजी शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ.आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले,

यावेळी सर्वप्रथम आशाताई शिंदे यांनी शि.भ.प.शिवानंद महाराज दापशेडकर यांच्या कीर्तनास उपस्थित राहून शिवानंद महाराज दापशेडकर यांचा आशीर्वाद घेतला,यावेळी पुढे बोलतांना आशाताई शिंदे म्हणाल्या की,लोहा-कंधार



मतदारसंघाचे आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी मतदारसंघातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली अनेक कामे तसेच नवीन विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंत्रालय स्तरावरून मंजूर करून आणून मतदारसंघाचा कायापालट केला आहे,जवळपास गेल्या अनेक वर्षापासून ही विकास कामे प्रलंबित होती,हीच कामे आमदार शिंदे यांनी ५ वर्षाच्या काळात पूर्ण केलेली असून लोहा-कंधार मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करून मतदारसंघात हरितक्रांती करण्याचा मानस आमदार शिंदे यांचा असून मतदारसंघाला मराठवाड्यात लोहा कंधार मतदारसंघ एक आदर्श विकासाभिमुख मॉडेल मतदारसंघ बनवण्याचे आमदार श्यामसुंदर शिंदे व माझे स्वप्न असून हे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आमदार शिंदे साहेब व मी सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी आशाताई शिंदे यांनी बोलतांना दिली, यावेळी गावकऱ्यांच्या वतीने आशाताई शिंदे यांचा भव्य फटाक्याची आतिषबाजी करून शाल,श्रीफळ, पुष्पहार देऊन भव्य सत्कार करण्यात आला,यावेळी कंधार बाजार समितीचे संचालक रोहित पाटील शिंदे,शेकापचे जिल्हाध्यक्ष बालाजी ईसादकर,ओमराजे शिंदे,नारायण सावकार कुंभारे,दत्ता कौशल्ये ,डिके कांबळे, प्रदीप हुंबाड,नागोराव कदम, व्यंकटराव कौशल्ये ,विशाल कौशल्ये,गंगाधर पवळे,शिवराज शिंदे सह महादेव मंदिर समितीचे अध्यक्ष संतुकराव मुपडे सह कार्यकर्ते, पदाधिकारी, गावकरी, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यकुशल विद्यार्थीप्रिय शिक्षक हरवले

## कै.मनोहरराव लख्येकर यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

आदरणीय गुरुवर्य कै. मनोहर लख्येकर सर यांच्या दुःखद निधनाची बातमी ही अतीव दुःखद व क्लेशदायी आहे.........

आदरणीय गुरुवर्य लख्येकर सर गेल्याचे दुःखद वृत्त समजले अन् मनात अगणिक आठवणींचा काहूर माजला अन् भावनिक कोलाहल सुरू झाली आणि जसाच-तसा भूतकाळ नजरेसमोर उभा राहिला..... आदरणीय गुरुवर्य लख्येकर सर म्हणजे वझरगा जि.प.शाळेचा कायापालट करणारे, शाळेला गाव, तालुका व जिल्हा पातळीवर लौकिक प्राप्त करून देणारे, अतिशय कष्टाळू, कार्यकुशल, क्रियाशील व कृतीशील आणि नवनवे उपक्रम राबवणारे विद्यार्थीप्रिय शिक्षक होय. अध्ययन व अध्यापनावर अफाट निष्ठा असलेले व अध्ययनाप्रती विद्यार्थ्यांची जिज्ञासा जागृत करण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण कला असलेले हुन्नरबाज व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय लख्येकर सर होत. निसर्ग आणि मुलांवर त्यांचे निस्सीम प्रेम ज्यांच्या संवर्धन व विकासासाठी सदोदित वेगवेगळे उपक्रम राबवणे हे ज्यांच्या नित्याचेच होते. विज्ञान आणि हिंदी शिकवण्याची एक आगळीच हातोटी त्यांच्या ठिकाणी होती, आजही ते शब्द कानामध्ये गुंजण्याचे भास होतात. दरवर्षी नित्यनेमाने सहल काढणे, विद्यार्थी-शिक्षक-पालक मिळावे घेणे, विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थी घेऊन जाणे व 'शेकोटी'सारखा अफलातून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडणे असे अगणिक आगळेवेगळे उपक्रम राबवण्याची आगळीच कसब त्यांच्या ठिकाणी होती. विद्यार्थ्याला शाळेत दाखल करणे, त्याच्या अडीअडचणी समजून घेणे, त्याच्या अनुपस्थितीचा मागोवा घेणे, काही आर्थिक अडचण वगैरे असल्यास प्रसंगी त्याला शैक्षणिक साहित्य स्व:खर्चातून आणून देणे हे त्यांच्या जीवनाचाच एक भाग होता. त्यांच्यामुळेच त्या काळात अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहाशी जोडले गेले हे सत्य नाकारून चालणार नाही. एक आदर्श शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून त्यांचे आमुच्या जीवनातील योगदान अफलातून व आदर्शवतच आहे. खऱ्या अर्थाने आम्हाला प्राथमिक अवस्थेत संस्कार आणि विचाराचे बाळकडू त्यांच्या माध्यमातून प्राप्त झाले हे कदापि विसरणे शक्य नाही.......



आदरणीय लख्येकर सरांसम गुरु आम्हास लाभले हे आमचे महत् भाग्यच, त्यांच्या संस्कारात खऱ्या अर्थाने आम्ही विद्यार्थी म्हणून घडलो आणि आज यशदायी वा आनंदी आयुष्याचे गोड फळे चाखत आहोत. सरांचे आम्ही साधारण ३० एक वर्षापूर्वीचे विद्यार्थी पण तसे कधीच जाणवले नाही, सततचा संपर्क व स्नेह कायम तसाच होता. सुट्टीत वगैरे सातत्याने भेटणे, ख्याली-खुशाली विचारणे, सुख-दुःखात आवर्जून सहभागी होणे अविरत चालूच होते. कारण गुरु-शिष्याच्या नात्याची विनच तशी घट्ट होती. आणि विशेष म्हणजे सरांची आमुच्या वझरगा गावातच बरीच सेवा पूर्ण झाल्याने समग्र वझरगा वासियांशीच सरांचे एक कौटुंबिक, जिव्हाळ्याचे नाते जोडले गेले होते.....

असे आदरणीय गुरुवर्य मनोहर लख्येकर सर आज आपल्यात नाहीत हे खरोखरच मनाला अतिशय वेदना देणारी बाब आहे. आदरणीय सरांच्या आत्म्यास चिरशांती लाभो व सरांच्या परिवारास हे अपार दुःख पेलण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.......

आदरणीय गुरुवर्य लख्येकर सरांच्या चरणी साश्रुनयनांनी भावपूर्ण आदरांजली..

**-डॉ.गोविंद पाटील वझरगेकर**

# रिमझिम पावसामुळे पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव;शेतकरी हवालदील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यात पावसांच्या रिपझिम पावसामुळे खरीप हंगामातील पिकांना रोगराई व किडरोगाचा प्रादूर्भाव दिसून येत आहे.यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून एकापाठोपाठ एक फवारण्यामुळे आर्थिक गणितही कोलमडताना दिसत आहे.

४ नक्षत्र संपले तरी मोठया पावसाची प्रतीक्षा अजून कायम आहे.पुणे,नाशिक,मुंबईकडे धो...धो... बरसत असताना कंधार तालुक्यात मात्र पाऊस बरसला नाहीच.नदी,नाले,तलाव अजून वाहिले नसून रिमझिम पावसामुळे वातावरणात बदल झाले आहेत. विषाणूजन्य आजार बळावत असून पिकांवर विविध प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.

सोयाबीनवर अळी पसरली असून कापूस,मूग,उडीद, ज्वारी, बाजरी, तुरीवर सुद्धा प्रादुर्भाव दिसून येत आहे. रिपरिप पावसामुळे कामे रखडली आहेत.वर्षभर पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध होण्यासाठी तर रब्बी हंगामासाठी मोठ्या पावसाची नितांत गरज व्यक्त केली जात आहे,

पेरणीनंतर सर्वांच्या नजरा आभाळाकडे लागलेल्या असताना पाऊस चांगला झाला.

पिकांची वाढ ही झपाट्याने झाली, लघु तलाव व साठवण तलाव याची पाण्याची पातळी म्हणावी तशी वाढलेली दिसून येत नाही.रिमझिम पडणाऱ्या पावसावर खरीप हंगामातील पीके तरली व जोमाने बोलत असल्याचे दिसून येत होते.तर शेतामधील पिका भोवतालचे तण काढण्यासाठी सततच्या पावसामुळे वापसा होत नसल्यामुळे पिकाच्या उंच गवत गेल्याचेही दिसून येत आहे,

खरीप हंगामात पिकांची स्थिती अतिशय उत्तम होती,सोयाबीन,तूर, मूग,उडीद,ज्वारी,बाजरी



कपाशीसह अन्य पिकाची वाढ बऱ्यापैकी झाली होती.परंतु सततच्या रिमझिम पावसामुळे शेतीच्याअंतर मशागतीची कामे खोळंबली आहेत,

सारख्या पावसामुळे पिके पिवळी पडत आहेत.अनेक विहिरी,नदी,नाले,बोअरला अजून पुरेसे पाणी आलेले नाही.अर्ध्याहून अधिक पावसाळा संपूनही शेतातून पाणी वाहत नाहीये. मोठा पाऊस पडला नाही,तर पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवण्याची भीती व्यक्त होत आहे. रब्बी हंगामाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.राज्यात सर्वत्र धो धो बरसणारा पाऊस तालुक्यात मात्र भूर भूर हजेरी लावत असल्याने चिंतेचे वातावरण आहे. कधी पाऊस, कधी कोरडे हवामान यामुळे विषाणूजन्य आजार बळावले आहेत.सर्दी, खोकला,ताप,गळा दुखी,डोके दुखी, अंगदुखी सारखे अनेक आजार बळावले आहेत.सध्या ही तीनही पिके रोगराईच्या कचाट्यात सापडली असून सोयाबीन व उडीद पिकांना पाने खाणाऱ्या आळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.पाने कुडतरणाऱ्या आळीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी शेतकरी औषधांची फवारणी करण्यात व्यस्त आहेत.यामुळे अतिरिक्त आर्थिक बोजा शेतकऱ्यांवर पडत आहे.

# देगलूर/ बिलोली मतदारसंघातून आपल्याला कामाला लागा असे आदेश-बी.एम.कांबळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

येणाऱ्या देगलूर बिलोली विधानसभा निवडणुकीत आपण देगलूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी आपण पक्ष नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या असून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आपल्याला कामाला लागा असे आदेश दिल्याचे निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे यांनी देगलूर येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

आक्टोबर महिन्यात राज्यात विधानसभेच्या निवडणुका होणार असून काँग्रेस व भाजप या प्रमुख पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार आपल्या नेत्यांना भेटत आहेत. देगलूर विधानसभा मतदारसंघ काही अपवाद वगळता सतत काँग्रेसपक्षाच्याच पाठिशी राहिला आहे. महाविकास आघाडीत हा मतदारसंघ काँग्रेस पक्षाच्या वाट्याला असून या पक्षाकडून आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी अनेकजण पक्षपातळीवर प्रयत्न करित असून



निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी बी. एम. कांबळे हे मागील दोन महिन्यापासून मतदारसंघातील मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत. देगलूर विधानसभेच्या पोटनिवडणुकीत ते इच्छुक उमेदवार होते मात्र त्यांना त्यावेळी काँग्रेस पक्षाकडून सबूरी राखण्याचा सल्ला देण्यात आला होता. मात्र मागील काही महिन्यात राज्याच्या राजकारणात तसेच मतदारसंघातील राजकीय बदल झाल्याने या वेळेस विद्यमान आमदारांना डावलून नवखा उमेदवार काँग्रेस पक्षाकडून उतरविला जाणार आहे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण येथेच झाल्याने बी. एम. कांबळे यांना हा मतदारसंघ नवखा नाही. प्रशासकीय सेवेत असताना सुध्दा त्यांचे कायम लक्ष देगलूरकडेच होते. कोरोना काळात सुध्दा आपण जातीने लक्ष ठेवून होतो. अनेक गरजूंना मदत देण्यासाठी आपण प्रयत्न केल्याचे बी. एम. कांबळे यांनी पत्रकारांना सांगितले. अधिकारी राहिल्याने मतदारसंघ विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी आपल्याकडे आराखडा असल्याचे ही त्यांनी सांगितले. काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह महाविकास आघाडीतील नेत्यांनी आपल्याला कामाला लागा असे आदेश दिल्याचे इच्छुक उमेदवार बी. एम. कांबळे यांनी सांगितले. आपल्याला मतदारांकडून उदंड प्रतिसाद मिळत असल्याचे ही त्यांनी सांगितले. यावेळी आरळी येथील उपसरपंच संजय नरहरे, पांडूरंग नरहरे आरळी, जनार्दन वाघमारे बिलोली, देगलूर येथील सेवानिवृत्त ज्येष्ठ विस्तार अधिकारी दयानंद सुर्यवंशी आदिसह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# स्व.आ.गणपतराव देशमुख यांच्या जयंती निमित्त खवासपूर येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्व आमदार गणपतरावजी देशमुख यांच्या ९७ व्या जयंती निमित्त खवासपूर ग्रामस्थ व पुरोगामी युवक संघटना यांनी अक्षय ब्लड बँक यांचे सौजन्याने आज खावसपूर ग्रामपंचायत कार्यालयात रक्तदान शिबीर आयोजित केले होते. या शिबिरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला विशेष करून तरुण व महिलांनी ही या शिबिरात उस्फुर्त पणे सहभाग नोंदवला यावेळी मा चेअरमन माणिक जरे, उपसरपंच नंदकुमार यादव,मा सरपंच हरिदास फुले,मा सदस्य व उद्योगपती नागनाथ जरे, नितीन जरे, विलास यादव सर यांचे सह लोकनियुक्त सरपंच गणेश दीक्षित,उपसरपंच नामदेव यादव, सदस्य भारत जरे, अजित ऐवळे, अण्णासाहेब भोसले, वैभव ढेरे,असंख्य ग्रामस्थ व रक्तदाते मोठया संख्येने उपस्थित होते.

### रेल्वेने एसटी बसने येणाऱ्या दिव्यांगांसाठी सूचना

# राज्यातील सर्व दिव्यांगांना आवाहन करण्यात येते की ९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात होणाऱ्या आक्रोश मोर्चाला परवानगी आहे

## पाऊस पाण्याची कसलीही परवा न करता सर्वांनीच या मोर्चात मोठ्या एकजुटीने सहभागी व्हावे-आ.बच्चु कडू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे




९ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर शहरात होणाऱ्या दिव्यांग आक्रोश मोर्चासाठी राज्यभरातून विविध मार्गाने एक लाख दिव्यांग सहभागी होणार आहेत..या दिव्यांगांना शहरात येणाऱ्या मुख्य रस्त्यावर जेवण आणि राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.सदरील मोर्चा क्रांती चौक येथून दुपारी ठीक दोन वाजता निघणार असून पैठण गेट,टिळक पथ, गुलमंडी,सिटी चौक पोलीस स्टेशन मार्गे विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकणार आहे.

राज्यातून येणारे सर्व दिव्यांग थेट पैठण गेट या ठिकाणी जमा होतील.पैठण गेट कडे येण्यासाठी रेल्वे स्टेशन किंवा बस स्टॅन्ड रोड मार्गे तापडिया नाट्यमंदिर चौकात दिव्यांगांनी उतरावे.तापडिया नाट्यमंदिर चौकापासून पैठण गेट हे ठिकाण अवघ्या दोन मिनिट पायी अंतरावर आहे..दिव्यांगांची गैरसोय होऊ नये म्हणून दिव्यांगांनी क्रांती चौकात न येता पैठण गेट या ठिकाणी यावे.. पैठण गेट ला येण्यासाठी सर्व दिव्यांगांनी आपल्याकडील वाहने तापडिया नाट्यमंदिर चौकात घेऊन यावे या ठिकाणी दिव्यांग उतरतील आणि त्यानंतर आपल्याकडील सर्व गाड्या कलेक्टर ऑफिसच्या बाजूला असलेल्या आमखास मैदानावरील पार्किंगवर जातील याची दक्षता घ्यावी..गाड्यांचे पार्किंग ठिकाण असलेले हमखास मैदान ते विभागीय आयुक्त कार्यालय हे अंतर जवळ जवळ असल्याने आपल्या आंदोलनाच्या सर्व गाड्या आमखास मैदानावर पार्किंग करतील याची देखील काळजी दिव्यांगांनी घ्यावी.तर राज्यातील सर्व प्रहारकरी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे क्रांती चौक या ठिकाणी जमा होतील.दिव्यांगांना पुन्हा सूचना की आपण मोर्चा सुरू होणाऱ्या क्रांती चौक या ठिकाणी जाऊ नये.दिव्यांगांची गैरसोय होऊ नये म्हणून आपण पैठण गेट याच ठिकाणी जमा व्हावे अशा सूचना प्रहार प्रमुख बच्चू कडू यांनी दिल्या आहेत.

### रेल्वेने एसटी बसने येणाऱ्या दिव्यांगांसाठी सूचना



राज्यातील जे दिव्यांग ८ ऑगस्ट रोजी रेल्वे आणि एसटी बसने छत्रपती संभाजीनगर शहरात दाखल होणार आहेत. त्यांनी आपण किती जण येणार आहात आणि किती वाजता येणार आहात याबाबत आम्हाला पूर्वकल्पना द्यावी.त्यासोबतच आपण आंदोलनाच्या दिवशी नऊ ऑगस्ट रोजी येणार असाल तर किती वाजता व किती जण येणार आहात त्याची देखील आम्हाला पूर्वकल्पना द्यावी.आपणास आंघोळ किंवा फ्रेश व्हायचे असेल तर त्यासोबतच आपल्याला नाश्ता जेवण हवे असेल तर त्याबाबतही पूर्वकल्पना द्यावी लागेल.छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) रेल्वे स्टेशनच्या बाजूला असलेल्या तिवारी मंगल कार्यालयात रेल्वे आणि एसटी बस द्वारे आलेल्या दिव्यांगांची व्यवस्था करण्यात आली आहे..खाजगी गाड्या आणि चार चाकी वाहनाने येणाऱ्या दिव्यांगांनी शहराच्या बाहेर व्यवस्था करण्यात आलेल्या लॉन्स आणि मंगल कार्यालयावर आपल्या मुख्य रस्त्यावरच फ्रेश होऊन फूड पार्सल जेवण घ्यावे.अधिक माहितीसाठी मेसेज करावा..प्रत्येकाला फोन वर बोलणे शक्य नाही..

**शिवाजी गाडे**
**दिव्यांग मोर्चा समन्वयक**
**छत्रपती संभाजीनगर ,मो ९७३०८९२७५०**

---

### युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या राज्यव्यापी अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळ्यास

# सर्व पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेश कचकलवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

हदगाव । प्रतिनिधी



समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेली एकमेव संघटना युवा ग्रामीण पत्रकार संघ आज राज्यभारत अग्रेसर असल्याने नांदेड व यवतमाळ या दोन जिल्ह्याचा सामायिक राज्यव्यापी अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा दि. १८.०८.२०२४ रोजी एकविरा देवी संस्थान हिवरा येथे आयोजित करण्यात आलेला आहे तरी सर्व पत्रकार बांधवांनी होणाऱ्या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे युवा ग्रामीण पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी सांगितले. अतिशय कमी कालावधीत पूर्ण महाराष्ट्र भरात जिल्हा, तालुका व सर्कल नुसार आज युवा ग्रामीण पत्रकार संघ स्थापन करून जिथे छोट्या - मोठ्या, ग्रामीण आणी शहरी भागातील पत्रकारांना वेगवेगळा दर्जा मिळत असल्याने त्यांनी जि संकल्पना करून पूर्ण महाराष्ट्र भरात कुठल्याही लहान मोठ्यांचा भेद नं करता सर्व पत्रकारांना सोबत घेऊन चालण्याचा जो विडा उचलेला आहे त्यास आज खरोखरच महाराष्ट्रात यश मिळाले आणी याचे खरे कारण म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला सर्वतोपारी मदत होत असल्याने या संघटने मध्ये राष्ट्रभरातून पत्रकार जुळलेले आहेत आणी एवढेच नव्हे तर भविष्यात पूर्ण भारतभर युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करू असेही त्यांनी यावेळी सांगितले..

नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पत्रकार बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने या अधिवेशनाला उपस्थित राहावे असे आव्हान हदगाव तालुका अध्यक्ष माननीय श्री अवधूत नामदेव खाडे यांनी केले.

---

# मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची ई-केवायसी करण्यासाठी पैसे देऊ नये-नाजीम शेख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे






राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना सुरू केली आहे.ज्यामध्ये पाच जणांच्या कुटुंबाला दरवर्षी तीन मोफत गॅस सिलिंडर मिळणार आहेत.केंद्र सरकारच्या पंतप्रधान उज्ज्वला योजनेचा आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना अन्नपूर्णा योजनेचा लाभ घेता येणार आहे.यासाठी जवळील गॅस एजन्सी कार्यालयात जाऊन ई-केवायसी करणे आवश्यक आहे. ई- केवायसी प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर देऊ नये असे आवाहन नगरसेवक नाजीम शेख यांनी केले आहे.

नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विविध योजनांची घोषणा करून त्यावर अंमलबजावणी करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.विशेषतः महिलांसाठी जास्तीच्या योजना राबवण्याचा संकल्प महाराष्ट्र सरकारने केला आहे.यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना यासह इतर योजनांचा समावेश आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा राज्यातील ५२ लाख १६ हजार ४१२ कुटुंबाला लाभ मिळणार आहे.वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणाऱ्या योजनेसाठी ई-केवायसी करणे आवश्यक आहे.हि प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून त्यासाठी कोणालाही पैसे देण्याची गरज नाही. जर कोणी पैश्याची मागणी करत असेल त्याची तक्रार करावी व त्याला पैसे देऊ नये असे आवाहन अजित पवार गटाचे नगरसेवक नाजीम शेख यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे..

---

## दौंड मध्ये खाद्यपदार्थ बनविणाऱ्या कंपनीत वायुगळती

### १७ कामगारांना श्वास घेण्यासाठी होवू लागला त्रास




लोकनेता न्यूज नेटवर्क । दौंड । बबनराव धायतोंडे

खाद्यपदार्थ बनविणाऱ्या कंपनीत वायूगळती झाल्याची घटना बुधवारी दि.०७ ऑँगस्ट रोजी दौंड तालुक्यातील भांडगांव मध्ये घडली.भांडगांव येथील टेस्टी बाईट इटेबल लिमेटेड कंपनी मधील ही घटना असून सतरा कामगारांना उपचार कामी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.सध्या या सर्व कामगारांची प्रकृती स्थिर असल्याचं डॉक्टरांनी सांगितले आहे.बुधवारी दि.०७ ऑँगस्ट रोजी सकाळी पावणे आठच्या सुमारास या कंपनीतून वायु गळती झाली.अमोनिया वायु बाहेर पडल्याने कंपनीत काम करणा-या १५ महिला आणि २ पुरुष कामगारांना उलटी जुलाबाचा त्रास सुरु झाला.श्वसनास अडचणी येऊ लागल्याने अश्वस्थ वाटु लागले.त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.


---

### वंजारी महासंघाचे दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

# कालसापेक्ष साहित्य निर्मितीसाठी दमदार पाऊल-प्रा.वा.ना.आंधळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

एरंडोल । प्रतिनिधी



महाराष्ट्रासह देशभरातील मराठी प्रज्ञावंतांकडून माय मराठीची अविरत साधना आणि सेवा घडत असून वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य या संस्थेने मराठी भाषा व साहित्य समृद्धीच्या दृष्टीने द्वितीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचे उचललेले धाडसी पाऊल अभिनंदनीय असल्याचे मत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी व्यक्त केले.प्रा.आंधळे हे वंजारी महासंघाच्या सन २०२२ मध्ये नाशिक येथे संपन्न झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी या भावना व्यक्त केल्या.यावेळी ते म्हणाले,साहित्यातून समाजमानाची स्पंदनं जपली जातात.साहित्य जर कालसापेक्ष असेल तर वर्तमानासह मानवी भविष्याला ते दिशादर्शक ठरतात.समाजहितैषी विचारांना व सृजनाविष्काराला दृढता यावी म्हणून छोटी मोठी सारीच साहित्य संमेलने ही गरजेची व आवश्यक असतात.नेमका हाच विचार वंजारी महासंघाने कृतिरुप करण्यासाठी दि.२५ ऑगस्ट २०२४ रविवार रोजी अहिल्यानगर येथे राष्ट्रसंत भगवान बाबा चौकातील गंगा लॉन्सच्या सभागृहात संमेलनाचे आयोजन केले असून समाज बंधू भगिनींनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहनही संमेलनाचे मावळते अध्यक्ष या नात्याने प्रा.आंधळेंनी केलेय.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सदरचे द्वैवार्षिक राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन घेण्याचा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक गणेशजी खाडे यांच्या अवाहनाला अहिल्यानगरकरांनी दिलेला प्रतिसाद निश्चितच उल्लेखनीय आहे.

सदर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी नांदेड येथील सुप्रसिद्ध साहित्यिका प्रा.डॉ.संगीता गणपतराव घुगे तर उदघाटक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त अधिसभा सदस्य प्रा.डॉ.गजाननराव सानप यांना निमंत्रित करण्यात आले आहे.संमेलनास प्रमुख अतिथी म्हणून अहिल्यानगरचे पालक मंत्री मा. श्री.राधाकृष्ण विखे पाटील ,खासदार म.श्री.निलेशजी लंके,माजी खासदार म.श्री.सुजयजी विखे पाटील,आमदार मा. श्री.संग्राम भैय्या जगताप,शिर्डीचे खासदार मा. श्री.भाऊसाहेब वाकचौरे,माजी खासदार मा. श्री.सदाशिवराव लोखंडे,संगमनेरचे आमदार मा. श्री.बाळासाहेब थोरात,राहुरीचे आमदार मा. प्राजक्ता तनपुरे,शेवगाव पाथर्डीच्या आमदार मा. मोनिकाताई राजळे,जामखेड कर्जतचे आमदार मा. श्री.रोहितजी पवार,मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ.नवनाथ आघाव,वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री.गणेशजी खाडे, नाशिक येथील उद्योगपती मा. श्री.बुधाजीराव पानसरे यांची उपस्थिती लाभणार आहे.संमेलन यशस्वितेच्या दृष्टीने संमेलनाचे स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार आघाव,यांचेसह सह स्वागताध्यक्ष रेणुका वराडे,सह स्वागताध्यक्ष घनश्याम बोडके,निमंत्रक नगर जिल्हा अध्यक्ष वंजारी महासंघ मल्हारी खेडकर अथक प्रयत्न करीत आहेत.हे संमेलन संस्मरणीय व ऐतिहासिक व्हावे यादृष्टीने स्थानिक व महाराष्ट्रातील साहित्य रसिक व समाज बंधू भगिनींपर्यंत निमंत्रण पाठविले जाणार असल्याचे वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य आघाडीचे उपाध्यक्ष तथा राज्य संपर्क प्रमुख साहित्यिक मा. चंद्रकांत धस यांनी व्यक्त केले.

---

# जि.प.केंद्र शाळा पाटोदा ता.जामखेड येथील एक मूल एक झाड उपक्रम स्तुत्य - प्रमोद मोरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे



पाटोदा शाळेत एक मूल एक झाड हा उपक्रम राबविण्यात आला.याप्रसंगी मार्गदर्शन करताना निसर्ग व सामाजिक पर्यावरण पदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद 'दादा' मोरे यांनी शाळेत राबवित असलेल्या उपक्रमाचे कौतूक केले.ते म्हणाले पर्यावरण संवर्धनाची प्रत्येक भारतीयाची जबबादारी आहे.जर पर्यावरणाचे संवर्धन केले नाही तर येणाऱ्या पिढी साठी उष्माघाताचे संकट अटळ आहे.वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन प्रत्येकाने केले पाहिजे.आमच्या मंडळा तर्फे राज्यभर त्या संदर्भात जनजागृती केली जाते.मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व वाटप केले जाते.या कार्यक्रमाला पाटोदा केंद्राचे केंद्र प्रमुख श्री रामराव निकम उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षाचे महत्व पटवून दिले.तसेच प्रत्येक विदयार्थ्यांनी आपल्या परिसरात दिलेल्या रोपाचे वृक्षारोपण करून संवर्धन करावे असे सांगितले.यावेळी संस्थेच्या कार्याध्यक्षा श्रीमती छायाताई राजपूत,जिल्हाध्यक्षा श्रीमती लतिकाताई पवार,स्नेहल कौशल्ये यांनीही मनोगत व्यक्त करून वृक्षरोपण काळाची गरज आहे असे सांगितले.

सर्वप्रथम गावातून वृक्ष दिंडी काढण्यात आली.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते विदयार्थ्यांना वृक्षाचे वाटप करण्यात आले . यावेळी श्री रामेश्वर चेमटे,श्री मोहन खवळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अयुब पठाण होते.

प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री उत्तम पवार यांनी केले. शाळेत एक मूल एक झाड हा उपक्रम प्रत्येक वर्षी राबविला जातो असे त्यांनी सांगितले. सुत्रसंचालन संगीता राठोड यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिता जोगदंड , सुलभा हजारे व अश्विनी कुमटेकर यांनी परिश्रम घेतले .

# श्री हुजूर साहेब नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रेला भाविक भक्तांचा प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । भारत वानरे

श्री हुजूर साहेब नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रेला भाविक भक्तांचा प्रतिसाद, सिडको हडको परिसरात अनेक ठिकाणी स्वागत, पुष्पवृष्टी. नवीन नांदेड :- श्री हुजूर साहेब नांदेड सिडको ते शिर्डी पदयात्रेला भाविक भक्तांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता, महाआरती झाल्यानंतर साईबाबा कि जय, साईनाथ महाराज की जय या घोषणा देत या पदयात्रेला सुरूवात झाली, सिडको हडको परिसरातील मुख्य मार्गावर विविध ठिकाणी फटाक्यांची आतिषबाजी ,पुष्पवृटी ढोलताशांच्या गजरात मार्गक्रमण करतांना विविध भागात साईबाबा पालखी पुजन व सहभागी यात्रेकरूंना चहा, फराळ, फळे वाटप करण्यात आली तर या यात्रेत खासदार अशोकराव चव्हाण यांच्या सह सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील अनेक जणांनी व पत्रकार यांच्या सह महिला युवक युवती यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. दरवर्षी प्रमाणे याही तेराव्या वर्षी श्रावणमास निमित्ताने साईबाबा नगर . सिडको नांदेड हुजूर साहेब येथुन शिर्डी पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता, या पदयात्रेत जवळपास १०० भाविक भक्त सहभागी होणार असून ही यात्रा ४१७ किलोमीटर आहे,यात पहिल्या दिवशी सिडको मरळक,आरळ,परभणी, पाळोदी,पाथरी,आष्टी,पिपरखेडा, नेवासा मार्ग शिर्डी २० आगस्ट रोजी ही पदयात्रा पोहचणार आहे, ६आगस्ट रोजी या पदयात्रेची सुरूवात महा आरती ने करण्यात आल्यानंतर सहभागी भाविक भक्तांचा सत्कार करण्यात आला तर या पदयात्रेत भाजपा खासदार अशोकराव चव्हाण ,नांदेड भाजपा महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते , युवा नेते संजय पाटील घोगरे, डॉ.नरेश रायेवार, विनोद कांचनगिरे, आकुरंगे,जयश्री जैस्वाल,वृक्ष मित्र मोहनराव पाटील घोगरे, विनोद कांचनगिरे, अनसाजी पाटील घोगरे, अतुल धानोरकर, यन्नावार परिवार यांच्या सह सामाजिक, राजकीय, व विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार बांधव सहभागी झाले होते. मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी पालखी पुजन,फटाक्याची आतिषबाजी,पुष्पवृटी करण्यात आली तर सहभागी भाविक साठी हडको येथे खिचडी वाटप तर पाणी वाटप व शिवाजी चौक सिडको येथे पुरी भाजी चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते,ही यात्रा सिडको मार्ग संभाजी चौक लातुर फाटा मार्ग जुना कौठा,नवीन पुल,जुना मोढा, वजिराबाद,कलामंदीर ,तरोडा नाका मार्ग निळा या ठिकाणी पहिला मुकाम करणार आहे,पदयात्रा यशस्वी साठी अध्यक्ष गणेश शामलाल जयस्वाल व ऊपाध्यक्ष मारोती वाघमारे ,साईबाबा पालखी सोहळा पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.



# उत्कर्ष महाविद्यालयात परिसंवाद संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत

सि.राजा येथील उत्कर्ष कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये मराठी विभाग आणि सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने लो. टिळक यांचा स्मृतीदिन आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.या याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.उत्तम अंभोरे हे होते.प्रमुख अतिथी विठ्ठल चव्हाण हे होते. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री सुनील सूरूले तसेच सांस्कृतिक विभाग आणि मराठी विभाग प्रमुख प्रा. संदीप अवसरमोल आदी उपस्थित होते.प्रारंभी परिसंवाद आयोजनाची महाविद्यालयाचे भूमिका प्रास्ताविकातून विशद करताना प्रा.संदीप अवसरमोल यांनी




विद्यार्थ्यांनी विचारांच्या मेजवानीचा आस्वाद घ्यावा.आणि विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे प्रतिपादन केले. सर्वप्रथम शुभेच्छापर मनोगतात प्रा. सुरूले यांनी महापुरूषाच्या जीवनकार्यातून प्रेरणा घेऊन समाजाचे जीवन समृद्ध व प्रगतशिल करता येते असे विचार मांडले. परिसंवादाला लाभलेले प्रमुख अतिथी विठ्ठल चहाण यांनी आपले विचार मांडताना महापुरुष हे वाचनसाठी नाही तर जगण्यासाठी असतात असे प्रतिपादन केले. प्रा.डॉ. अरूण वाळके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला तर प्रा. विरेंद्र तायडे यांनी लोकमान्य टिळक यांच्या राजकिय प्राणि सामाजिक दृष्टिकोन : एक आकलन या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.उत्तम अंभोरे हे स्वतः चळवळीतील कार्यकर्ते असल्याने त्यांनी महापुरुषांनी केलेल्या चळवळीचे महत्त्व विशद केले. तसेच आपण सर्वांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून त्यानुसार मार्गक्रमन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.नरहरी राऊत तर आभार प्रा. श्रद्धा महाजन यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. उदय म्हस्के प्रा. मल्लिकार्जुन कोथळीकर प्रा. स्नेहांकिता पुंडकर डॉ.संगीता बावस्कर प्रा. अक्षय कुरगळ प्रा. अजिंक्य गायकवाड प्रा. पांडुरंग तांबेकर, शुभम भाग्यवंत, विश्वंभर मराठी, नरेश जाधव,तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती नांदेड येथे मोठ्या उत्साहात साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती नांदेड येथील राष्ट्रसंत भगवान बाबा चौक लातूर फाटा लातूर रोड नांदेड येथे दिनांक ४.८.२४ रोजी दरवर्षीप्रमाणे राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली यावेळी कार्यक्रमास डॉ संपतराव राख, विठ्ठलराव केंद्रे, रमेश नागरगोजे,भरत केंद्रे,गुरूनान घुगे,निरपणे, मोरे, विठ्ठल घुगे,जळके, दत्तात्रय घुगे, संजय केंद्रे,रवि वडजे, संग्राम केंद्रे, पृथ्वीराज गीते, मंगेश राख,श्याम वडजे, कृष्णा सांगळे, प्रदिप,अरविन नेवळे , गणेश रब्बेवार, संभाजी मुंडे, आदित्य गीरी, बाबुराव मुंडे, गोविंद केंद्रे,पंढरी मुसळे,हरीकेश घुगे,कारामुंगे,राजू गीते, गोविंद मुंडे, ओंकार राख, सुधाकर मुंडे यांच्या सह मोठ्या संख्येने मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# सतत पाऊसामुळे पिवळी पडलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई ध्या-रवी ढोबळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

आष्टी तालुक्यामध्ये मध्यंतरी सतत रिमझिम पावसामुळे सोयाबीन,उडीद,कापूस,मूग व कांदा ही पिके पिवळी पडली आहेत तरी शेतकऱ्यांना शासनाने प्रत्येक बांधावर जाऊन पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये हेक्टरी अनुदान देण्यात यावी . सविस्तर माहिती अशी की, कधी नव्हे या वर्षी शेतीला पूरक असा पाऊस झाला त्यामुळे शेतकरी आनंदित झाला होता परंतु त्यांचा हा आनंद क्षणिक ठरला असून मधल्या काळात सतत पावसाच्या रिपरिपी मुळे पिके पिवळी पडली आहेत त्यामुळे शेतकऱ्याला आर्थिक दृष्ट्या अनेक अडचणीला सामोरे जावे लागले आहे.अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पोळा सण आला आहे अगोदरच कर्ज काढून किंवा उसनवारीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे



त्यांच्या कडे हा साजरा करण्यासाठी शेतकऱ्यांकडे कसल्याही प्रकारची एक रुपयाही शिल्लक राहिलेला नसल्यामुळे जे पैसे उपलब्ध होते ते सर्व बी बियाणेमध्ये खर्च झाले आहे तालुक्यामध्ये चांगल्या प्रकारे रिमझिम पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे पिके ही पिवळे पडले आहे त्यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणी सापडला आहे तरी सरकारने याकडे गांभीर्यानेलक्ष देऊन प्रत्येक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे करून तात्काळ अहवाल शासनाला पाठवावा व शेतकऱ्यांना काहीतरी अनुदान देण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्यांचा व बळीराजाचा सण म्हणजे पोळा हा असून बैलाला सजावट करण्यासाठी काहीतरी मदत शासनाने देण्यात यावी असे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रवी काका ढोबळे यांनी तहसीलदार साहेब यांना निवेदनाद्वारे कळवले आहे.

# कवळे गुरुजी तुम्ही आमदार झालात तर काय होईल?- शिर्डीचा देव साई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड

मारोतराव पाटील कवळे गुरुजी तुम्ही आहात शेतकऱ्यांचे भाई...! तीन कारखाने काढून,पाच हजार बेरोजगारांना काम देऊन झालात त्यांची आई..! विरोधी काहीही बोलो पण तुमच नाव जनतेचा मनात आहे ठाई ठाई...! एका सामान्य कुटुंबातील व्यक्ती ज्याने कष्टाने रक्ताचे पाणी करून ३ कारखाने २० बँका उभारल्या आणि बेरोजगारांना काम दिलं...स्वतः कर्जात जाऊन लोकांना हातभार लावला.... अशा वाघाचा तो छावा...जर आमदार झाला तर काय होईल..? कधी कारखान्यात गुरुजीला भेटायला आलेल्या शेतकऱ्याला विचारा.. एक लाख रूपये पगार असणाऱ्या कर्मचाऱ्याला गुरुजी उभे करतात पण शेतकऱ्याला बसायला



खुर्ची देतात...म्हणूनच तर कवळे गुरुजी शेतकरी नेते म्हणून ओळखले जातात राम राज्य का यावं अस लोकांना वाटतं कारण राम राज्य हे शेतकरी आणि गरीब जनतेला न्याय देणार राज्य होत... म्हणूनच आजही आपल्या कडे म्हणतात इडा पिडा टळू दे बळी चे राज्य येऊ दे...मग हा बळीराजा कोण..? बळीराजा म्हणजे शेतकरी राजा...आणि जर शेतकऱ्यांचं राज्य हवय तर मग गुरुजी आमदार झाले पाहिजे...अशी शिर्डी च्या साई ची ईच्छा आहे. मग गुरुजी आमदार झाले तर काय होईल....? आपल्या नायगाव मतदार संघाला शिस्त लागेल.....कधी कारखान्यावर जाऊन कर्मचाऱ्याला विचारा की गुरुजी मीटिंग कशी घेतात.....जर गुरुजी आमदार झाले तर मीटिंगा होतील सोमवार..ग्रामसेवक,मंगळवार..तलाठी बुधवार...तहसील,गुरुवार...पंचायत समिती शुक्रवार..सगळ्या शाळा आणि कॉलेज शनिवार...पोलीस पाटील,रविवार...खाजगी सगळ्यांना शिस्तीत आणतील आणि कोणताही गोर गरीब ,मजूर, शेतकरी कोणत्याही ऑफिसच्या चक्करा मारणार नाही...गुरुजींची त्यावर पण एक स्वतःची समिती ठेवतील देखरेखी साठी.... वॉट्सप ग्रुप ठेवतील ज्याने त्यांना वेळोवेळी कोणता ग्रामसेवक तलाठी,शिक्षक, कोणतापन अधिकारी काय करत आहे हे कळेल आणि लगेच त्यांना गुरुजी सांगतील....गुरुजी तुम्ही आमदार झालात तर काय होईल...? क्यालन होतील जलसागर या मतदार संघात येईल जो शेतकरी आज पैदल आहे तो गाडीवर फिरेल ,जो गाडीवर आहे तो बुलट,अन जो बुलट वर आहे तो कार मध्ये फिरेल येवढ्या खंडर पडलेल्या कारखान्याला तुम्ही कामधेनू बनवलात अन् पाच हजार,लोकांना काम दिलात ते पण सत्ता नसताना ,अंन जर सत्ता आली तर काय काय करसाल सत्ता नसताना जर येवढं केलात.



जळकोट तालुक्यात गजानन दिगांबर भालेराव या तरूणाचा मुंबई येथे दुर्दैवी मृत्यू झाल्याचे समजताच वाढवण्याचे सुपुत्र युवा सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल अण्णा अनिल जाधव यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन परीवारांची सांत्वन केली.



आमदार रोहित दादा पवार यांची मुंबई हॉटेल ओबेरॉय येथे हरी पाटील शिंदे सहशिक्षक संत गाडगे महाराज विद्यालय लोहा यांनी सदिच्छाभेट घेऊन दिलखुलास चर्चा केली (छाया दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क लोहा)

## वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य आयोजित दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन

# अध्यक्षपदी प्रा.डॉ.संगीता गणपतराव घुगे तर उदघाटकपदी प्रा.डॉ.गजानन सानप यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहिल्यानगर । प्रतिनिधी

दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी अहिल्यानगर येथील गंगा लॉन्स वर वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य आयोजित दुसरे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे.या संमेलनाच्या अध्यक्षपदी नांदेड येथील सुप्रसिद्ध कवयित्री तथा समीक्षक प्रा.डॉ.सौ.संगीता गणपतराव घुगे तर उदघाटकपदी छत्रपतीसंभाजीनगर येथील सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ प्रा.डॉ.गजाननराव सानप यांची निवड झाली असून निवड समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांनी आज रोजी या निवडीची घोषणा एका पत्रांन्वये केलीय.

डॉ.संगीता घुगे या सध्या यशवंत महाविद्यालय नांदेड येथे १९९८ पासून अध्यापन करीत असून समीक्षा आणि संशोधनात त्यांचे कार्य अधोरेखित व्हावे या उंचीचे आहे. शिवाय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रातील त्यांचे कर्तृत्व उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा गौरव विविध संस्था संघटनांनी वेळोवेळी केलाय. नव्वदोत्तर कवयित्री म्हणूनही त्या ख्यातकीर्त आहेत. तर उदघाटक डॉ.गजानन सानप हे सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा





विद्यापीठात मागील दहा वर्षांपासून पदवीधर गटातून सिनेट सदस्य म्हणून त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान त्यांनी दिलेय. शिवाय विद्यापीठ विकास मंच महाराष्ट्र राज्याचे सचिव म्हणूनही त्यांचे कार्य स्पृहणीय आहे. शिवाय विद्यापीठात स्वायत्त संस्था गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण संशोधन संस्थेचे ते संस्थापक आहेत.सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांची आजवरची वाटचाल अभिनंदनीय असून त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर अठरापेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. आस्था या सामाजिक संस्थेचे व स्वामी समर्थ अनाथ आश्रमाचे संस्थापक संचालक असून विविध पुरस्कारांचे ते मानकरी ठरले आहेत.

संमेलनाध्यक्ष व उदघाटकांच्या निवडीचे वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक विचारवंत प्रबोधनकार श्री.गणेशजी खाडे यांचेसह नाशिक येथे संपन्न झालेल्या वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.वा.ना. आंधळे यांनी अभिनंदन केले. स्वागताध्यक्ष आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू राजकुमार अघाव, सह-स्वागताध्यक्ष रेणुका वराडे, सह-स्वागताध्यक्ष घनश्याम बोडके, मल्हारी खेडकर हे संमेलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904